**<u>नि.क्र.२६/क.</u>**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची शपथेवर जबानी</u>** .....

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

माझे नाव – सदानंद विठू सुतार,
वय – ४२ वर्षे,
व्यवसाय – पोलिस पाटील,
राहणार – कळसगादे, ता. चंदगड, कोल्हापूर.

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र.०१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. डी. चव्हाण यांचेमार्फत</u>** –

१. दिनांक ०९/०५/२०२० रोजी मला पोलिसांनी कळसगादे गावामध्ये फिर्यादीच्या घरासमोर पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तिथे पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी अनुक्रमांक २ वर सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.२७</u>** देण्यात येत आहे. घटनास्थळ फिर्यादीच्या घरासमोर होते. सदरचे घटनास्थळ आम्हांला फिर्यादीने दाखविले. त्यावेळी दुसरे पंच प्रिती कृष्णा पोपकर होती.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. एस. जाधव यांच्याकडून–</u>**

२. मी पोलिस पाटील म्हणून १४ वर्षे कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस पाटलांना दैनंदिन डायरी ठेवावी लागते व त्यामध्ये कामाची नोंद घ्यावी लागते. पंच म्हणून हजर राहण्यासाठी मला पोलिसांनी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी ब–याच केसेसमध्ये पंच म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे याबाबत मी कागदपत्रे पाहिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा गट क्रमांक अथवा मिळकत क्रमांक मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन आजुबाजूला वस्ती विरळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये भावकीवरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे पोलिस स्टेशनला नेहमी

जाणे येणे असते. हे म्हणणे खरे नाही की, प्रिंन्टेड पंचनामा पोलिसांनी तयार केला होता आणि माझी त्यावर सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस कोणत्या क्रमांकाच्या गाडीमधुन आले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे फिर्यादीशी संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत व्हावी म्हणून पोलिस स्टेशनला सही करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर कोणताही घटनास्थळ पंचनामा झालेला नाही. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

ASHATAI NARAYAN SARAK

Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.07.02 15:13:56 +0530

**ठिकाण – चंदगड**		**( ए. एन. सरक )**

**दिनांक – ०२/०७/२०२६**		**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चंदगड.**